# बृहन्मुंबई महानगरपालिका

## आपत्कालीन व्यवस्थापन विभाग

## पावसाळी परिस्थितीचा अहवाल

### ३ ऑगस्ट ते ४ ऑगस्ट २०१९ सकाळी ८.३० ते ८.३० (२४ तास)

१. पाऊस:

| स्थळ | २४ तासांचा पाऊस (मिमी) | ३ ऑगस्ट २०१९ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | वार्षिक सरासरी पाऊस (मिमी) | २०१९ पावसाची टक्केवारी | ३ ऑगस्ट २०१७ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | २०१८ पावसाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| कुलाबा | १४२.० | १७४२.२ | २२०३ | ७९.०८% | १५४४.१ | ६९.१२% |
| सांताक्रुझ | २०४.० | २३७४.२ | २५१४ | ९४.४४% | १९४४.५ | ७७.३२% |

२. मनपाच्या स्वयंचलित केंद्रांवर नोंदविण्यात आलेला सरासरी पाऊस:

| विभाग | २४ तासांचा पाऊस (मिमी) | ३ ऑगस्ट २०१९ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | शहर व उपनगरातील सरासरी पाऊस (मिमी) | मुंबईत झालेला एकुण सरासरी पाऊस (२३५८) (मिमी) |
|---|---|---|---|---|
| शहर | ११५.५६ | १७५२.४५ | ७९.५५% | ८६.३९% |
| पूर्व उपनगरे | १९५.४८ | २२५५.६६ | ८६.६९% | |
| पश्चिम उपनगरे | १९४.९५ | २१०३.०६ | | |

३. तापमान:

| स्थळ | कमाल | किमान |
|---|---|---|
| कुलाबा | २७.० | २५.२ |
| सांताक्रुझ | २६.७ | २४.१ |

४. समुद्राची भरती:

| दिनांक | भरतीची वेळ | लाटांची उंची | दिनांक | ओहोटीची वेळ | लाटांची उंची |
|---|---|---|---|---|---|
| ०४.०८.२०१९ | मध्यरात्री १:४५ | ४.४२ मी. | ०४.०८.२०१९ | सकाळी ७:३६ | ०.४२ मी. |
| **०४.०८.२०१९** | **दुपारी २:२९** | **४.८३ मी.** | ०४.०८.२०१९ | रात्री ८:३३ | ०.८५ मी. |
| ०५.०८.२०१९ | मध्यरात्री २:३६ | ४.३४ मी. | ०५.०८.२०१९ | सकाळी ८:२२ | ०.७६ मी. |

५. हवामान अंदाज: कुलाबा वेधशाळेने पुढील २४ तासांकरिता वर्तविलेल्या अंदाजानुसार मुंबई शहर व उपनगरात अधुनमधून पावसाच्या सरी पडत रहातील. काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

६. **२४ तासात उच्चतम पावसाची नोंद झालेली ठिकाणे:**

| शहर | पूर्व उपनगरे | पश्चिम उपनगरे |
|---|---|---|
| मलबार हिल – १४४ मिमी | विक्रोळी (प) – ३०० मिमी | कांदिवली अग्नि.केंद्र – २७६ मिमी |
| एफ/ उत्तर -१४० मिमी | गवाणपाडा, मुलुंड - २६८ मिमी | के/पूर्व - २५४ मिमी |
| भायखळा – १३६ मिमी | एस विभाग – २४७ मिमी | दिंडोशी – २४९ मिमी |
| महापालिका मुख्यालय – १३४ मिमी | कुर्ला - १८८ मिमी | मालाड - २३५ मिमी |
| वरळी – १३३ मिमी | भांडूप संकुल – १७७ मिमी | चिंचोली – २२२ मिमी |
| कुलाबा – १३० मिमी | चेंबुर – १५६ मिमी | के/पश्चिम -२२० मिमी |
| | | प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृह – २१८ मिमी |
| | | जोगेश्वरी – २१५ मिमी |
| | | गोरेगांव – २०४ मिमी |

७. **पाणी साचणे** : दिनांक ०४.०८.२०१९ रोजी पहाटे पासून सुरु झालेल्या जोरदार ते अतिजोरदार पर्जन्यवृष्टीमुळे शहरात सायन तर पश्चिम उपनगरात कांदिवली, जोगेश्वरी, अंधेरी, मालाड, सांताक्रुझ, गोरेगांव आणि पूर्व उपनगरात कुर्ला, घाटकोपर, चेंबुर, मुलुंड या भागातून पाणी साचल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. पाणी साचण्याच्या तक्रारींवर कार्यवाही सुरु असून काही ठिकाणचे पाणी पूर्णपणे गेलेले आहेत.

८. **घर पडल्याच्या तक्रारी** : शहरात १, पूर्व उपनगरात ५ व पश्चिम उपनगरात ५ अशा एकूण ११ ठिकाणी घराचा / भिंतीचा भाग पडण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधित विभागांना कळवून मदतकार्य रवाना करण्यात आले.
मार नाहि.

९. **दरड कोसळणे** : दिनांक ०४.०८.२०१९ रोजी सकाळी ७:४५ वा. पोलीस नियंत्रण कक्षातून प्राप्त माहितीनुसार राजीव गांधी नगर, नुरानी मस्जिद जवळ, दिंडोशी, गोरेगांव (पू) येथे दरडीचा काही भाग खाली असणा-या रिकाम्या घरांवर कोसळला. मार नाही.

१०. **शॉर्टसर्किट** : शहरात ११, पूर्व उपनगरात ८ आणि पश्चिम उपनगरात २६ अशा एकुण ४५ ठिकाणी शॉर्टसर्किट होण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधित विद्युत पुरवठा यंत्रणांना कळविण्यात आल्या आहेत. मार नाही.

११. **झाडे/फांद्या पडण्याच्या तक्रारी**: शहरात २४, पूर्व उपनगरात ४२ आणि पश्चिम उपनगरात ७२ अशा एकुण १३८ ठिकाणी झाडे/फांद्या पडण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधीत विभागांना कळविण्यात आल्या आहेत. मार नाहि.

१२. **वाहतुक व्यवस्था** : (आज सकाळी ९:०० वा. प्राप्त माहितीनुसार)

- **पश्चिम रेल्वे** : वाहतुक सुरळीत सुरु आहे
- **मध्य रेल्वे** : मध्ये रेल्वेची वाहतूक बंद ठेवण्यात आली आहे.
- **हार्बर रेल्वे** : वाशी ते पनवेल व सिएसटी ते वडाळा अशी वाहतूक सुरु आहे.

- **बीईएसटी** : वाहतूकीचे तात्पुरत्या स्वरुपावर बदलण्यात आलेले मार्ग:-

| अनु. क्र. | शहर | पूर्व उपनगरे | पश्चिम उपनगरे |
|---|---|---|---|
| १ | समाज मंदिर हॉल, प्रतिक्षानगर | हुमा सिनेमा, कांजुरमार्ग - वाहतूक पूर्ववत सुरु | मोतिलाल नगर, पोस्ट ऑफिस, गोरेगांव (प) |
| २ | सायन रोड नं. २४ - वाहतूक पूर्ववत सुरु | कमानी/शितल, एलबी एस रोड | साईनाथ सबवे, मालाड |
| ३ | गांधी मार्केट (किंग सर्कल) - वाहतूक पूर्ववत सुरु | | दहिसर सबवे |
| ४ | | | मिलन सबवे, सांताक्रुझ (प) |
| ५ | | | विरा देसाई रोड, अंधेरी (प) |
| ६ | | | काजु पाडा, बोरिवली (पू) |
| ७ | | | डहाणुकर वाडी, कांदिवली (प) – वाहतूक पूर्ववत |
| ८ | | | ओल्ड नागरदास रोड, अंधेरी (पू) – वाहतूक पूर्ववत |
| ९ | | | एस व्ही रोड नॅशनल कॉलेज – वाहतूक पूर्ववत |

१३. **विशेष माहिती:१)** दिनांक ०३.०८.२०१९ रोजी पहाटे ०४:३० नवरंग इमारत, १५५/१५७, अब्दुल रेहमान स्ट्रिट तळमजला अधिक पोटमाळा अधिक चार मजली इमारतीमध्ये अंदाजे ६० x ४०स्वे फुटच्या भागात इलेक्ट्रिक वारींग, इलेक्ट्रिक साहित्य, स्टेशनरी इत्यादिंना स्तर ४ ची आग होती. घटनास्थळी मोठ्या प्रमाणात धुर झाला असल्यामुळे इक्शास्ट ब्लोवर, थरमल इमॅर्जींग कॅमेरा, बीए सेट इत्यादिंना आग होती. घटनास्थळी अग्निशमन दलामार्फत २ क्युआरव्ही, १० जंबो टँकर, ३ बीए व्हॅन, १ रेस्क्यू व्हॅन, १ एचपीएल, १ कमांड वाहन, १ एएलपी, २ टीटीएल, १ रोबो व्हॅन, व ५ -१०८रुग्णवाहिका पाठविण्यात आल्या. सदर आग सायंकाळी ०४:३५ वा सर्व बाजुंनी आटोक्यात अणण्यात आली असून सायं. ४:४५ वा आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले आहे. आग विझविण्याचे काम अग्निशमन दलामार्फत सुरु आहे.

आग विझवितांना किरकोळ झालेले केंद्र अधिकारी श्री ए बी पवार व अग्निशमन सी एस गुप्ता यांना जी टी रुग्णालयात उपचार करुन पाठविण्यात आले आहे. अगीत धुरामुळे श्वसनाचा त्रास झालेले अग्निशमन श्री अनिल म्हात्रे यांना नायर रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे.

२) दिनांक ०४.०८.२०१९ रोजी मिठी नदीने धोक्याची पातळी गाठल्यामुळे क्रांतीनगर परिसरातील ४०० नागरिकांना जवळच असलेल्या बजारवाड महापालिका शाळेत स्थलांतरीत करण्यात आले. स्थलांतरीत करण्यात आलेल्या सर्व लोकांकरिता चहा, पाणी, नाश्ता, वैद्यकिय व्यवस्था करण्यात आली.

===